INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2019 Special Issue – 200

## Cotemporary Problems in India and Remidies

**Guest Editor :**
Dr. R. V. Shikhare
**Principal**
**R. B. Attal Arts, Science & Commerce College,**
**Georai, Dist. Beed (M.S) India**

**Associate Editors -**
Mr. H. B. [illegible]
Mr. B. S. Jogdand
Mr. R. B. Kale
Mr. S. S. [illegible]
Mr. R. B. [illegible]

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Serviees (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

169

| | | | |
|---|---|---|---|
| 65 | आतंकवाद : समस्या तथा नियंत्रण | संदीप गोरे | 261 |
| 66 | समकालीन हिंदी कविता में स्त्री संवेदना | संतोष नागरे | 265 |
| 67 | हिंदी लेखिकाओ के उपन्यासों में अभिव्यक्त स्त्री विमर्श | डॉ. सुनिल डहाले | 271 |
| 68 | कौसल्या बैसंत्री की आत्मकथा 'दोहरा अभिशाप' में दलित नारी जीवन | डॉ. रजनी शिखरे, अशोक उघडे | 275 |
| 69 | विनय मिश्र की ग़ज़लो में बाजारवाद | डॉ. रजनी शिखरे | 278 |
| 70 | वाहरू सोनवणे की कविताएँ ('पहाड हिलने लगा है' के संदर्भ में) | संतोष नागरे | 281 |
| | **मराठी विभाग** | | |
| 71 | पर्यावरण प्रशासन : काळाची गरज | डॉ. व्ही. पी. सांडूर | 287 |
| 72 | भारतीय लोकशाही मधील 'भ्रष्टाचार' एक प्रबळ समस्या | डॉ. अंकुशराव चव्हाण | 290 |
| 73 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या | भाग्यश्री पानढवळे | 293 |
| 74 | बीड जिल्ह्यातील इमारत बांधकाम कामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास | एस. ई. भोसले | 298 |
| 75 | नक्षलवाद एक सामाजिक समस्या : सामाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. दत्तात्रय भूताळे | 304 |
| 76 | शेतकरी आत्महत्या भारतीय समाजासमोरील अव्हान व उपाय योजना | टी. एस. बिडवे | 308 |
| 77 | नक्षलवादी चळवळीची विचारसरणी | डॉ. रजनी बोरोळे | 312 |
| 78 | भारतीय राजकारण आणि धर्म, जात, भाषा | डॉ. देविदास नरवाडे | 318 |
| 79 | मॉब लिचींग : एक गंभीर समस्या | डी.एन. रिठे | 321 |
| 80 | भ्रष्टाचार : एक विवेचन | डॉ. डी.के. ढास | 325 |
| 81 | दहशतवाद | डॉ. बी.एस.चव्हाण | 330 |
| 82 | मानसशास्त्र आणि दहशतवाद : एक आकलन | डॉ. अतुल पवार | 335 |
| 83 | भ्रष्टाचार : कारणे व उपाय | डॉ. भगवान वाघमारे | 338 |
| 84 | नक्षलवाद : भारतातील कडव्या साम्यवादी संघटनांची सशस्त्र चळवळ | डॉ. भारत बिचितकर | 342 |
| 85 | मराठवाड्यातील सिमांत शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यावरील उपाय | गोविंद काळे व दीपक भारती | 347 |
| 86 | शेतकरी आत्महत्या : कारणे आणि उपाय | डॉ. दत्तात्रय डुंबरे | 350 |
| 87 | नक्षलवादी चळवळीची विचारधारा आणि व्यवहार | डॉ. एस. पी. घायाळ | 353 |
| 88 | मराठी कादंबरी आणि अर्थकारण : विशेष संदर्भ 'फेसाटी' | डॉ. गोविंद काळे | 359 |
| 89 | सामुहिक हिंसाचार | डॉ. विठ्ठल जाधव | 363 |
| 90 | ब्रिटिशांच्या कायद्याचा भारतीय समाजावर झालेला परिणाम | सचिन पांडव, डॉ. लक्ष्मीकांत जिरेवाड | 368 |
| 91 | वनतोडीमुळे उदभवणाऱ्या समस्यांचे अध्ययन (संदर्भ : पवन तालुक्यातील सिन्सी या गावातील कुटुंब) | ज्योती नाकतोडे | 373 |
| 92 | पर्यावरणविषयक मुद्दा | डॉ. काकासाहेब पोफळे | 389 |
| 93 | स्वयंसहाय्यता गट आणि सशक्तीकरण : एक अवलोकन | डॉ.संतोष काकडे | 383 |
| 94 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या | डॉ.काशिनाथ पल्लेवाड (सावळीकर) | 387 |
| 95 | सामाजिक समस्या आणि नव्वदोत्तरी मराठी कविता | डॉ. समिता जाधव | 390 |
| 96 | भारतातील दारिद्र्य | डॉ. शिवाजी पाते | 395 |
| 97 | जेष्ट नागरिकांच्या समस्यांचे सामाजिक निराकरण | डॉ. सुधीर येवले | 400 |
| 98 | भ्रष्टाचार : भारतीय समाजासमोरील एक ज्वलंत समस्या | डॉ. सुनंदा आहेर | 404 |
| 99 | पर्यावरण आणि भारतीय शेती | डॉ. योगेश पाटील | 409 |
| 100 | समकालीन राजकीय परिस्थिती आणि विरोधी पक्षाची भूमिका | डॉ. भुजंग पाटील | 412 |




170

ISSN :
October-2019

# मॉब लिचिंग : एक गंभीर समस्या

डी. एन. रिठे
सहाय्यक प्राध्यापक
श्री शिवाजी महाविद्यालय परभणी

**प्रस्तावना:-**

मागच्या काही वर्षामध्ये भारतामध्ये मॉब लिचिंगच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. कधी धर्माच्या नावाखाली तर कधी मुलं चोरीच्या आरोपाखाली जमावाकडुन कायदा आपल्या हाती घेऊन आरोपीला जीव जाईपर्यंत मारहाण केल्या जाते परंतु कोणत्याही प्रकारे घटनेची सत्यता तपासण्याचा प्रयत्न केल्या जात नाही. अशा घटनांमुळे देशापुढे एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. अशा घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी तत्परतेने पाऊले उचलावी लागतील.

**संशोधनाची उद्दिष्टये:-**

१) मॉब लिचिंग म्हणजे काय? याचा अभ्यास करणे.
२) मॉब लिचिंगच्या कारणांचा शोध घेणे.
३) मॉब लिचिंगच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी उपायांची चर्चा करणे.

**संशोधन पध्दती:-**

संशोधन लेखासाठी दुय्यम माहिती स्त्रोतांचा अभ्यास करण्यात आलेला आहे त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रांतील लेख, सरकारची आकडेवारी, इंटरनेट इ. साधनांचा आधार घेतलेला आहे.

भारतात सर्वात पहिले गोहत्येचे आरोप लावुन हिंसेच्या स्वरुपात मॉब लिचिंगची सुरुवात झाली. त्यानंतर लहान मुलांचे अपहरण व अन्य आरोपाच्या नावाखाली ही समस्या वेळोवेळी आपल्या उग्र स्वरुपात समोर येत आहे.

**मॉब लिचिंगचा अर्थ व इतिहास:-**

मॉब लिचिंगचा ढोबळ मानाने अर्थ जमावाकडुन संशयाच्या आधारावर कोणतीही सत्यता न पारखता आरोपीस निर्दयीपणे मारहाण करुन ठार मारणे.

लिचिंग हा इंग्रजी शब्द आहे. हा शब्द विल्यम लिंच यांच्या नावाशी जोडलेला आहे. त्याचा जन्म अमेरिकेतील वर्जिनिया प्रातांत इ.स.१७४२ मध्ये झाला होता. विल्यम कॅप्टन लिचंने एक स्वतंत्र न्यायालय बनविले होते. त्याचा तो स्वयंघोषित न्यायाधिश होता. त्याचा प्रत्येक निर्णय समाजामध्ये दहशत निर्माण करणारा होता. तो कोणत्याही आरोपीची बाजु न ऐकता व कोणत्याही न्यायीक प्रक्रियेचे पालन न करता आरोपीला सर्वासमोर निर्दयीपणे ठार मारत होता.

लिचिगंचे सर्वात जाच बळी अमेरिकेत आफ्रिकी मुळचे लोक ठरले. इ.स. १८८२ ते इ.स. १९०८ या काळात ३५०० पेक्षा लोकांना ठार मारण्यात आले. लिचिगं शब्दाचा वापर सर्व प्रथम इ.स. १७८० ला करण्यात आला. त्यावेळेस लिचिगं फक्त अमेरिके पर्यंतच सिमित होता. पुढे काळाच्या ओघात ही कुप्रथा अन्य देशातही पोहोचली.

भारतात आज लिचिगंचा प्रयोग एक राजकीय शस्त्र म्हणुन होऊ लागला आहे. मागील काही दशकात भारतात लिचिगच्या घटना बेरोखटोकपणे होत आहेत. अशा प्रकारच्या घटनेतील गुन्हेगाराविरुध्द सरकार कडे वेगळा कायदा नाही. याचाच फायदा उचलुन गुन्हेगार लिचिगंच्या घटना घडवून आणत असुन सुध्दा वाचत आहेत. अमेरिकेत लिचिगच्या वाढत्या घटनामुळे इ.स.१९२२ मध्ये लिचिगं विरोधी कायदा बनविण्यात आला. भारतात मात्र अशा कायदा अभावी आज पर्यंत अनेक प्रशासकीय अधिकारी, राजकीय नेते, सामान्य माणसे लिचिगंचे बळी ठरले आहेत. इ.स. १९९४ मध्ये बिहार येथील गोपलगंजचे जिल्हाधिकारी जी कृष्णय्या यांना अनियंत्रित जमावांनी ठेचुन ठार मारले होते. पतप्रधान इंदिरा गाधीजींच्या हत्येनंतर ३१ ऑक्टोंबर १९८४ मध्ये देशभरात जमावांद्वारे शिखाची कत्तल करण्यात आली.

ISSN : 2348-7143
October-2019

डेटा-जर्नलिझम वेबसाईट इंडिया स्पेड्सच्या मतानुसार २०१० पासुन गोहत्येच्या संशयावरुन मॉब लिचिगंच्या ८७ घटना समोर आल्या ज्यामध्ये ३४ लोक मारल्या गेलेत व १५८ लोक गंभीर स्वरुपात जखमी झाले या संशयीतामध्ये अधिकांश मुस्लीम आणि दलितांचा समावेश होता.

**मॉब लिचिगंचे कारणे:-**

- मॉब लिचिगंची अनेक कारणे सांगता येतील बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक समुदायामध्ये वाढत जाणारा अविश्वास यामुळे एक समुदाय दुसऱ्या समुदायाकडे संशयाच्या नजरेने पाहत आहे व संधी मिळताच एकमेकांचा बदला घेण्यासाठी जमावाला भडकविण्याचे काम केल्या जात आहे.
- लोकांच्या मनात शासन व्यवस्था, न्याय व्यवस्था व सुरक्षिततेबद्दल असलेल्या रागामुळेही अशा घटनांना वाव मिळत आहे.
- सोशल मिडीयाचा गैरवापर हे सुध्दा एक महत्वाचे कारण आहे. सोशल मिडीयावर पाठविले जाणारे चुकीचे संदेश व अफवा यामध्ये व्हॉट्अपची भुमिका महत्वाची आहे.
- स्थानांतर हे सुध्दा एक महत्वाचे कारण आहे. आर्थिक प्रश्नामुळे अनेक लोक एका इलाक्यातुन दुसऱ्या इलाक्यात जाऊन राहतात. त्यांना राहण्याची जागा तर मिळेल परंतु त्यांच्यावर स्थानिकांचा विश्वास नसतो. यामुळेही अशा घटना घडतांना दिसतात.
- राजकीय व सामाजिक संघटनांचा स्वार्थ सुध्दा या घटनांसाठी जबाबदार आहे.

**मॉब लिचिगंचे दुष्परिणाम:-**

मॉब लिचिगंच्या घटना ह्या भारताच्या संविधानात निहित असलेल्या मुल्यांच्या विरुध्द आहेत. संविधानाने प्रत्येक व्यक्तिला काही मुलभुत अधिकार दिलेले आहेत. मॉब लिंचिगंमुळे या अधिकाराचे उल्लंघन होते. अशा घटनांमुळे पीडीतांमध्ये उपराष्ट्रवादी भावना निर्माण होते. समाजातील एकजुटता प्रभावित होते व बहुसंख्यांक विरुध्द अल्पसंख्यांक अशी स्थिती निर्माण होते. तसेच देशी व विदेशी आर्थिक गुंतवणुकही प्रभावित होऊ शकते अशा घटनांचा लाभ कट्टरपंथीय लोक उचलतात व समाजात दुही निर्माण करतात. अनेक आंतरराष्ट्रीय समित्यांनी भारताला मॉब लिचिगंच्या संदर्भात चेतावनी दिली आहे.

**मॉब लिचिगंच्या प्रतिबंधासाठी प्रयत्न:-**

देशातील वाढत्या मॉब लिचिगंच्या घटनांमुळे जुलै २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने संसदेला मॉब लिचिगं विरुध्द कडक कायदा करण्यास सांगितले. तसेच राज्य सरकारांना आदेश दिले की, त्यांनी संविधानानुसार कार्य करावे. सोशल मिडीयावर झालेल्या चर्चेवर, मेसेजवर कडक लक्ष ठेवावे जेणे करुन समाजात द्वेष पसरविणारे मेसेज, मुलांची चोरी किंवा गोतस्करी च्या संशयावरुन होणाऱ्या मॉब लिंचिगंच्या घटना थांबविता येतील.

गृहमंत्रालयाद्वारा गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री समुह व गृह सचिवांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात आली. त्याद्वारे सर्व राज्य व केंद्रशासीत प्रदेशांना अशा अफवांवर कडक नजर ठेवण्यास व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक पावले उचलण्यास सांगितले. सरकारद्वारा अशा अफवा थांबविण्यासाठी लवकरच एक सोशल मिडीया पॉलिसी बनविण्यात येणार आहे. आयटी मंत्रालयाला असा मसुदा तयार करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच या क्षेत्रात जागरुकता. अभियान चालवुन लोकांमध्ये विश्वास वाढविण्याच्या उपायावरही जोर देण्यास सांगण्यात आले आहे. स्वतः सोशल मिडीयांनीही प्रयत्न सुरु केले आहेत. मनिपुर हे देशातील पहिले राज्य होय. ज्याने मॉब लिंचिगं विरोधी एक उल्लेखनिय कायदा पास केला.



172

ती भारतातील लिचिगंची सर्वात मोठी घटना होती. त्यानंतर इ.स.२००२ मध्ये गुजरातमध्ये दंगे झाले. तेथे मॉब लिचिगंच्या अनेक घटना घडल्या. इ.स. १९८४ व २००२ मधील घटनेत सामिल असलेल्या गुन्हेगारांना अजुनही शिक्षा झ ालेली नाही. यामुळे देशातील न्यायव्यवस्था व प्रशासन व्यवस्थेसमोर प्रश्नचिन्ह निर्माण होतात.

इ.स.२००६ मध्ये महाराष्ट्रातील भंडारा जिल्हयात लिचिगंची घटना घडली होती त्याला खैरलांजी हत्याकांड या नावाने ओळखतात. ही घटना मानवतेवरील कलंक होती. त्याच वर्षी दुष्कर्म करणाऱ्या एका आरोपील तेलंगणातील निजामाबाद जिल्हयात दगडाने ठेचुन ठार मारले, तर इ.स. २०१५ मध्ये नागालँड मधील डिमापूर येथे ७०० लोकांनी एका दुष्कर्म करणाऱ्या आरोपीला तुरुंगाचे गेट तोडुन बाहेर काढले व निर्वस्त्र करुन शहरात फिरवुन लाठ्या काठ्यांनी ठार मारले. लिचिगं विरोधी कडक कायद्या अभावी व राजकीय संरक्षणामुळे गुन्हेगार नियमांचे उल्लंघन करुनही दोषमुक्त होतात.

सध्याच्या काही वर्षामध्ये लिचिगंच्या घटनामध्ये वाढ झाली आहे. इ.स.२०१५ मध्ये उत्तर प्रदेशातील दादरी येथे अखलाव खानला मॉब लिचिगंचा बळी ठरावे लागले तर दुसरीकडे राजस्थान मधील अलवर येथे पहलुखान व नंतर रकबर खानला गोरक्षकांच्या आक्रोशाचा बळी ठरावे लागले. अशा अनेक घटना देशात घडल्या व त्या थांबविण्याचे नाव घेत नाहीत. मॉब लिचिगं हे मानवतेच्या विरुध्द आहे त्याला कायद्याच्या अंतर्गत आणल्याशिवाय अशा घटनांमध्ये बळी ठरणाऱ्यांना न्याय मिळणार नाही.

**मॉब लिचिगंचे दुसरे रुपः-**

लहान मुलांना पळवुन नेणे या अफवेमुळे जमावाचे अलग रुप दिसुन येते. यामध्ये जमावाच्या हिंसे मागे एक भितिदायक चित्र दिसुन येते. मुलांची चोरी होणे हे कोणासाठीही फार मोठी भिती व चिंता आहे असा विचार मनात येऊनच लोकांमध्ये प्रचंड भिती निर्माण होते. अशा वेळेस जमावामध्ये निर्माण झालेली हिंसा ही ताकदीमुळे नाहीतर भितीमुळे तयार होते. त्यांचा हेतु अल्पसंख्यांकांना मारण्याचा नसुन अनोळखी व बाहेरच्यांना शिक्षा देणे हा असतो.

जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्रातील धुळे जिल्हयातील रैनपाडा गावामध्ये लाहन मुले चोरणारी टोळी सक्रीय असल्याच्या अफवेमुळे जमावांनी अनोळखी पाच लोकांना लाठ्या काठ्यांनी मारुन ठार केले. अशा प्रकारच्या घटना देशातील अनेक भागामध्ये घडताना दिसुन येतात.

**मॉब लिचिगंचा नायकः-**

आज आपण डिजिटल युगात राहतो जेथे मेसेज तारेच्या गतीप्रमाणे पसरतात. गाव, शहर, चौकामध्ये होणाऱ्या चर्चेचा आवाका प्रचंड आहे. अफवा आणि खोटी बातमी सोशल मिडीयाच्या माध्यमाने तिव्रतेने समाजात पसरते त्यामध्ये व्हॉटअप ची भुमिका महत्वाची आहे. त्याद्वारे पसरणारे मेसेज व अफवा समाजाचा नायक बनतो.

मॉब लिचिगंच्या घटनेची एक दुःखद बाजु म्हणजे राजकीय व सामाजिक संघटना या घटनांना आपल्या सोयीनुसार जास्त हवा देतात. यामध्ये त्यांचा विरोध खरा नसुन राजकीय जास्त असतो.

**मॉब लिचिगंच्या घटनांची आकडेवारीः-**

२०१८ मध्ये केंद्रीय गृहमंत्री हंसराज अहिर यांनी राज्यसभेमध्ये प्रश्नाला उत्तर देतांना म्हटले की, सरकार जवळ मॉब लिचिगंच्या घटनांची एकुण आकडेवारी उपलब्ध नाहीत. त्यांनी म्हटले, १४ पेक्षा जास्त राज्यांनी नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो ला अशा घटनांचा आकडा दिला नाही. २०१४ ते २०१७ पर्यंतच्या रेकॉर्डवर नजर टाकल्यास फक्त नऊ राज्यांचीच आकडेवारी सरकारकडे उपलब्ध आहे. या आकडेवारीनुसार २०१४ ते मार्च २०१८ च्या दरम्यान या नऊ राज्यांत मॉब लिचिगंच्या ४० घटना घडल्या त्यात ४५ लोक मारल्या गेले.

ISSN : 2348-7143
October-2019

डेटा-जर्नलिझम वेबसाईट इंडिया स्पेड्सच्या मतानुसार २०१० पासुन गोहत्येच्या संशयावरुन मॉब लिचिगंच्या ८७ घटना समोर आल्या ज्यामध्ये ३४ लोक मारल्या गेलेत व १५८ लोक गंभीर स्वरुपात जखमी झाले या संशयीतामध्ये अधिकांश मुस्लीम आणि दलितांचा समावेश होता.

**मॉब लिचिगंचे कारणे:-**

- मॉब लिचिगंची अनेक कारणे सांगता येतील बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक समुदायामध्ये वाढत जाणारा अविश्वास यामुळे एक समुदाय दुसऱ्या समुदायाकडे संशयाच्या नजरेने पाहत आहे व संधी मिळताच एकमेकांचा बदला घेण्यासाठी जमावाला भडकविण्याचे काम केल्या जात आहे.
- लोकांच्या मनात शासन व्यवस्था, न्याय व्यवस्था व सुरक्षिततेबद्दल असलेल्या रागामुळेही अशा घटनांना वाव मिळत आहे.
- सोशल मिडीयाचा गैरवापर हे सुध्दा एक महत्वाचे कारण आहे. सोशल मिडीयावर पाठविले जाणारे चुकीचे संदेश व अफवा यामध्ये व्हॉट्अपची भुमिका महत्वाची आहे.
- स्थानांतर हे सुध्दा एक महत्वाचे कारण आहे. आर्थिक प्रश्नामुळे अनेक लोक एका इलाक्यातुन दुसऱ्या इलाक्यात जाऊन राहतात. त्यांना राहण्याची जागा तर मिळेल परंतु त्यांच्यावर स्थानिकांचा विश्वास नसतो. यामुळेही अशा घटना घडतांना दिसतात.
- राजकीय व सामाजिक संघटनांचा स्वार्थ सुध्दा या घटनांसाठी जबाबदार आहे.

**मॉब लिचिगंचे दुष्परिणाम:-**

मॉब लिचिगंच्या घटना ह्या भारताच्या संविधानात निहित असलेल्या मुल्यांच्या विरुध्द आहेत. संविधानाने प्रत्येक व्यक्तिला काही मुलभुत अधिकार दिलेले आहेत. मॉब लिचिगंमुळे या अधिकाराचे उल्लंघन होते. अशा घटनांमुळे पीडीतांमध्ये उपराष्ट्रवादी भावना निर्माण होते. समाजातील एकजुटता प्रभावित होते व बहुसंख्यांक विरुध्द अल्पसंख्यांक अशी स्थिती निर्माण होते. तसेच देशी व विदेशी आर्थिक गुंतवणुकही प्रभावित होऊ शकते अशा घटनांचा लाभ कट्टरपंथीय लोक उचलतात व समाजात दुही निर्माण करतात. अनेक आंतरराष्ट्रीय समित्यांनी भारताला मॉब लिचिगंच्या संदर्भात चेतावनी दिली आहे.

**मॉब लिचिगंच्या प्रतिबंधासाठी प्रयत्न:-**

देशातील वाढत्या मॉब लिचिगंच्या घटनांमुळे जुलै २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने संसदेला मॉब लिचिगं विरुध्द कडक कायदा करण्यास सांगितले. तसेच राज्य सरकारांना आदेश दिले की, त्यांनी संविधानानुसार कार्य करावे. सोशल मिडीयावर झालेल्या चर्चेवर, मेसेजवर कडक लक्ष ठेवावे जेणे करुन समाजात द्वेष पसरविणारे मेसेज, मुलांची चोरी किंवा गोतस्करी च्या संशयावरुन होणाऱ्या मॉब लिचिगंच्या घटना थांबविता येतील.

गृहमंत्रालयाद्वारा गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री समुह व गृह सचिवांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात आली. त्याद्वारे सर्व राज्य व केंद्रशासीत प्रदेशांना अशा अफवांवर कडक नजर ठेवण्यास व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक पावले उचलण्यास सांगितले. सरकारद्वारा अशा अफवा थांबविण्यासाठी लवकरच एक सोशल मिडीया पॉलिसी बनविण्यात येणार आहे. आयटी मंत्रालयाला असा मसुदा तयार करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच या क्षेत्रात जागरुकता, अभियान चालवुन लोकांमध्ये विश्वास वाढविण्याच्या उपायावरही जोर देण्यास सांगण्यात आले आहे. स्वत: सोशल मिडीयांनीही प्रयत्न सुरु केले आहेत. मनिपुर हे देशातील पहिले राज्य होय. ज्याने मॉब लिचिगं विरोधी एक उल्लेखनिय कायदा पास केला.

ISSN :
October-2019

**निष्कर्ष:-**

मॉब लिचिंगच्या घटना देशासाठी फार घातक आहेत. कोणताही सत्य असत्याचा विचार न करता फक्त अफवा व संशयाच्या आधारावर कायदा हातात घेऊन आरोपीला अत्यंत रानटी व हिंसक पध्दतीने ठार मारणे हा मानवतेवरील कलंक आहे. अशा घटनांना तात्काळ प्रतिबंध घातला पाहिजे यासाठी सरकार, न्यायालय व समाजाने कसोशिने प्रयत्न करणे गरजेचे आहे. अशा घटनेतील आरोपींना राजकीय संरक्षण मिळाले नाही पाहिजे व आरोपीवर तात्काळ कारवाई झाली पाहिजे. अशा घटनेवेळी पोलीसांनी कार्यतत्परता दाखविली पाहिजे. तरच अशा घटनांवर नियंत्रण मिळविता येईल अन्यथा यामुळे समाजाचे पर्यायाने देशाचेच मोठे नुकसान होणार आहे.

**संदर्भ सुची ग्रंथ:-**

Edited Michael J. Pfeifer, Global lynching and collective violence, published chinversity of Illinois press 2017
ziya us salman, Lynch files, sage, publication New Delhi-2019
The Hindu
लोकसत्ता
इंटरनेट